निक पुण्य नगरी दि ०१।१२।२०२५

# शहरातील मोहिमेत पोलिसांकडून ८८ सराईत गुन्हेगारांची तपासणी

**नांदेड/ प्रतिनिधी**

ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत नांदेड शहरात कोम्बिंग ऑपरेशन राबवुन सराईत गुन्हेगारांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

नांदेड शहरातील चोरीच्या व गंभीर गुन्ह्यांची दखल घेत पोलिस अधीक्षकांनी सर्व पोलिस ठाण्यांतर्गत ऑपरेशन फ्लश आऊट राबविण्याचे आदे दिले आहेत. त्यानुसार नांदेड शहरात दि.२९ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ ते सकाळी ८ दरम्यान सराईत गुन्हेगारांना चेक करून कार्यवाही करण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा नांदेड येथील अधिकारी, अंमलदार तसेच नांदेड शहरातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. या मोहिमेत गंभीर गुन्हे दाखल असलेले, अवैध शस्त्र बाळगणारे, हद्दपार/ तडीपार आरोपी, हिस्ट्रीशिटर, सराईत गुन्हेगार यांची तपासणी करण्यात आल.तसेच जामीनपात्र व अजामीनपात्र वॉरंटची अंमलबजावणीही करण्यात आली. या शोध मोहिमेत २७ अधिकारी, ११२ पोलिस अंमलदार सहभागी झाले होते. या मोहिमेत ८८ सराईत गुन्हेगार चेक करण्यात आले. जामीनपात्र २० वॉरंट तर अजामीनपात्र ५ वॉरंटची अंमलबजावणी करण्यात आली. शस्त्रास्त्र प्रकरणी गुन्हे दाखल असलेले २४ गुन्हेगार चेक करण्यात आले.प्रस्तावित महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ५५, ५६, ५७, एमपीडीए प्रकरणातील ३८ गुन्हेगार चेक करण्यात आले. तडीपार करण्यात आलेले ४३ जण चेक करण्यात आले आहेत.भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुरनं २३/२५ आणि इस्लापूर पोलिस ठाण्यात गुरनं ५०/२० प्रकरणातील आरोपींना स्थागुशा पथकाने पकडून संबंधीत ठाण्याच्या हवाली केले.

# 'पोक्सो' तील फरार २ आरोपीला घातल्या बेड्या

**नांदेड / प्रतिनिधी**

शहरातील भाग्यनगर परिसरात दोन वर्षांपूर्वी घडलेल्या एका पोक्सो गुन्ह्यातील फरार आरोपीला भाग्यनगर पोलिसांनी अटक केली असून यातील हे दोन आरोपी गुन्हा घडल्यानंतर फरार झाले होते. त्यानंतर भाग्यनगर पोलिसांनी यांच्यावर सतत माहिती काढत या दोन्ही आरोपींना शनिवारी अटक केली आहे.

पोक्सोचा गुन्हा २०२३ च्या कालावधीत अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अत्याचार केल्याप्रकरणी दाखल झाला होता. आकाश साहेबराव सूर्यवंशी (वय २६, रा. दाभड मारुती मंदिराजवळ, ता. अर्धापूर), राजेसुरपा राजू देवराव बगाटे (वय २५, रा. कल्याणनगर, सम्राट अशोक



चौक, तरोडा बु., नांदेड) या दोघांवर भाग्यनगर पोलीस ठाण्यात विविध कलम अंतर्गत दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून हे दोघे आरोपी फरार होते.

दरम्यान, गुन्हे शोध (डीबी) पथकातील पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, पो. उपनि नरेश वाडेवाले व त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी गजानन किडे, विष्णुकांत मुंडे, राहुल लाटकर, रंगनाथ चापके, देवसिंग सिंगल, राजू घुले, अदनान पठाण, अंकुश कांबळे, विशाल माळवे या भाग्यनगरच्या पोलिसांना याबाबत माहिती मिळाली त्यानंतर पोलिसांच्या पथकाने आरोपी नांदेडमध्येच असल्याची खात्री होताच या आरोपींना अटक करण्याकरता या पथका सापळा लावला होता. यात हे आरोपी अटक झाल्याची माहिती समोर आली आहे. आरो आकाश सूर्यवंशी हा दाभड येथे असल्या माहिती मिळाल्यानंतर डीबी पथकाने त्या ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली अस दुसरा आरोपी राजेश बगाटे हा कल्याणन तरोडा भागात असल्याची माहिती दिल पोलिसांनी राजेश बगाटे **(पान ४ वर..)**